नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०८/२०२६ (शनिवार )

.....................................................................................

# जलालखेडा पोलीस अंतर्गत दरोडा टाकुन मेंढ्या–बकऱ्या चोरी केल्याचा गंभीर गुन्हा उघड १० आरोपी आणि ३ विधीसंघर्ष ग्रस्त बालक असे १३ जण निष्पन्न
# ९ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त
# स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा:– मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०७/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी १० आरोपी आणि ३ विधीसंघर्षग्रस्त बालक यांना निष्पन्न करत दरोडा टाकुन मेंढ्या–बकऱ्या चोरी केल्याचा गंभीर गुन्हा उघड केला आहे.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत दिनांक ०३/०८/२०२६ रोजी पहाटे मौजा रोहणा, ता. नरखेड येथे फिर्यादी मारोतराव बांबल यांच्या शेतातील गोठ्यावर ४ अनोळखी आरोपींनी फिर्यादीचे हातपाय बांधून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर ४५ मेंढरे व १६ बकऱ्या असा एकुण किंमती २,८९,०००/– रूपयांचा मुद्देमाल जबरीने वाहनात भरून चोरून नेला होता. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अप क्रं** ४५४/२०२६ कलम ३०९(४),३५१(२),३(५)भा.न्या.स. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले. श्री अंकुश माने ,पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वाखाली ३ विशेष पथके तयार करण्यात आली. सदर तपास पथकाने घटनास्थळ मौजा रोहणा शिवार ठिकाणापासुन तांत्रीक पदधतीने तपास सुरू करून मौजा जलालखेडा, वरूड ,आष्टी ,मोर्शी, तळेगाव , मोवाड यापरिसरात तपास करित तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही, गोपनिय महीती तसेच विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून आरोपींचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान देवेन्द्र उर्फे भुऱ्या पवार, रा. उमठा पारधी बेडा (जलालखेडा) याचा त्याच्या साथीदारांसह गुन्हयात सहभाग असल्याचा निष्पन्न झाले.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर आरोपीचा कसुन शोध घेतला असता दिनांक ०७/०८/२०२६ रोजी मौजा जलालखेडा ते वरूड रोडवर एका पांढ—रा रंगाच्या आय—२० कार क्र एम एच ४६ ए पी ३३०७ मध्ये देवेन्द्र उर्फे भुऱ्या पवार आणि त्याचे साथीदार सोन्या पवार, लखन उर्फ लोकेश भोसले, पवन पवार, योगेश दशरथ सरोदे, आणि २ विधीसंघग्रस्त बालक सर्व रा.उमठा असे मिळुन आले. सर्व आरोपींना ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता अशाप्रकारे माहीती प्राप्त झाली की, सदर गुन्हयातील आरोपी देवेन्द्र उर्फे भुऱ्या पवार रा उमठा पारधी बेडा (जलालखेडा) आणि त्याचे साथीदार संतोष चव्हाण रा. आष्टी, योगेश सरोदो रा. साहुर,ता.आष्टी जि वर्धा , गोंविंदा पवार रा.साहुर यांनी त्यांच्या इतर साथीदारांसह पूर्वनियोजन करून सदर गुन्हा करण्यासाठी वाहनाची व्यवस्था केली होती. त्यांनी पिकअप वाहनाच्या नंबर प्लेटवर पट्ट्या लावून क्रमांक झाकला होता. रात्रीच्या वेळी सर्व आरोपी मौजा रोहणा येथील गोठ्याजवळ पोहोचले. त्यानंतर काही आरोपी पायदळ गोठ्याकडे गेले व फिर्यादीला धमकावून हातपाय बांधून ठेवले. इतर आरोपींनी पिकअप वाहन गोठ्याजवळ आणून फिर्यादीच्या गोठ्यातील मेंढ्या व बकऱ्या वाहनात भरून जबरीने चोरून नेल्या. **तसेच चोरीतील मेंढ्या व बकऱ्या विक्रीसाठी इतर आरोपींच्या मदतीने बाहेर पाठविल्याचे निष्पन्न झाले. तसेच यातील आरोपी नामे ०१) संतोष रामसिंग चव्हाण आणि २) देवेन्द्र उर्फे भुऱ्या राजेंद्र पवार यांनी मिळुन यापुर्वी पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत बकरी चोरीचा एक गुन्हा केल्याची माहीती प्राप्त झाली आहे**

**सदर गुन्हयामध्ये ०१) संतोष रामसिंग चव्हाण, वय ३६ वर्ष रा वार्ड क्र. ०२ इदिंरा नगर आष्टी जि.वर्धा ,२) देवेन्द्र उर्फे भुऱ्या राजेंद्र पवार, वय २९ वर्ष रा उमठा पारधी बेडा (जलालखेडा) जि. नागपुर ग्रा. ३) सतिश भोजणसिंग जाधव, वय २८ वर्षे रा. रेडवा ता.चांदुर बाजार जि.अमरावती, ४) रोशन जुगल चव्हाण, वय २४ वर्षे रा. रेडवा ता. चांदुर बाजार जि.अमरावती, ५) सोन्याजी शेरू पवार, वय १९ वर्षे, रा.उमठा ता नरखेड जि. नागपुर , ६) पवन दाऱ्या पवार ,वय २५ वर्षेरा.उमठा ता नरखेड जि.नागपुर ७) लखन उर्फे लोकेश शेरू भोसले, वय १९ वर्षे रा.उमठा ता नरखेड जि.नागपुर ८) वैभव विलासराव माहोरे, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्र. ०३ खडकपुरा, आष्टी जि.वर्धा ९) अकुंश उर्फे चेतन केशवराव पोकळ, वय ३५ वर्षे, रा. वार्ड क्र. ०३ खडकपुरा, आष्टी, जि.वर्धा, १०) योगेश दशरथ सरोदे, वय २१ वर्षे रा. रा. साहुर,ता.आष्टी जि वर्धा यांच्यासह ३ विधीसंघर्ष ग्रस्त बालकांचा सहभाग निष्पन्न झाला. आरोपी क्र. १ ते १० यांना अटक करण्यात आले आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष गुन्ह्यात वापरलेले वाहन महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन क्र एम एच २७ डी टी ०३२७, एक हुंडाई आय—२० कार क्र एम एच ४६ ए पी ३३०७, होंडा युनिकॉर्न मोटारसायकल, ७ मोबाईल फोन तसेच जनावरे विक्री तुन मिळालेली रोख रक्कम १,२५,०००/— रूपये असा एकुण ९,६०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**उघड गुन्हे**

**१) अप क्रं ४५४/२०२६ कलम ३०९(४),३५१(२),३(५)भा.न्या.स.**
**२) अप क्रं ३८५/२०२६ कलम ३०५(अ) भा.न्या.स.**

# जानेवारी ते जुलै २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्हयांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्हयाला दुसरे स्थान प्राप्त

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ (जानेवारी ते जुलै) सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्ह्यांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच जुलै २०२६ पासून **Dynamic Enforcement Action Plan** हा अभिनव उपक्रम **SaveLIFE Foundation** यांच्या तांत्रिक सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आला आहे.

सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक व डेटा–आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, या उपक्रमामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी प्राप्त होत आहे.

सन २०२६ (जानेवारी ते जुलै) या कालावधीत प्राणांतिक रस्ते अपघातांमध्ये १७ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये २३ टक्क्यांनी, तर जखमींच्या संख्येत ६ टक्क्यांनी घट झाली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने दुसरे स्थान प्राप्त केले आहे.

# MAHARASHTRA STATE

## Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO JUL 2025 | | | JAN TO JUL 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO JUL 2025- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | MB-VV | 443 | 108 | 390 | 524 | 115 | 472 | 18 | 6 | 21 |
| 2 | Navi Mumbai | 455 | 177 | 403 | 531 | 163 | 490 | 17 | -8 | 22 |
| 3 | Gadchiroli | 145 | 106 | 121 | 168 | 81 | 250 | 16 | -24 | 107 |
| 4 | Ratnagiri | 213 | 77 | 279 | 243 | 84 | 291 | 14 | 9 | 4 |
| 5 | Nasik City | 304 | 124 | 296 | 343 | 102 | 322 | 13 | -18 | 9 |
| 6 | Raigad | 388 | 156 | 508 | 428 | 177 | 493 | 10 | 13 | -3 |
| 7 | Wardha | 216 | 105 | 229 | 238 | 111 | 194 | 10 | 6 | -15 |
| 8 | Parbhani | 308 | 149 | 258 | 337 | 174 | 250 | 9 | 17 | -3 |
| 9 | Latur | 476 | 230 | 292 | 520 | 253 | 340 | 9 | 10 | 16 |
| 10 | Thane R | 254 | 142 | 216 | 275 | 158 | 242 | 8 | 11 | 12 |
| 11 | Thane City | 599 | 133 | 582 | 646 | 159 | 590 | 8 | 20 | 1 |
| 12 | C.S.Nagar City | 372 | 112 | 313 | 401 | 123 | 363 | 8 | 10 | 16 |
| 13 | Jalna | 410 | 228 | 404 | 435 | 239 | 389 | 6 | 5 | -4 |
| 14 | C.S.Nagar R | 504 | 339 | 271 | 529 | 316 | 377 | 5 | -7 | 39 |
| 15 | PCPC | 750 | 231 | 661 | 780 | 205 | 766 | 4 | -11 | 16 |
| 16 | Gondia | 207 | 108 | 131 | 215 | 124 | 156 | 4 | 15 | 19 |
| 17 | Dhule | 417 | 238 | 418 | 433 | 236 | 491 | 4 | -1 | 17 |
| 18 | Pune City | 801 | 183 | 590 | 815 | 185 | 648 | 2 | 1 | 10 |
| 19 | Hingoli | 266 | 156 | 213 | 270 | 148 | 230 | 2 | -5 | 8 |
| 20 | Amravati City | 234 | 47 | 230 | 237 | 61 | 229 | 1 | 30 | 0 |
| 21 | Beed | 471 | 270 | 306 | 477 | 224 | 304 | 1 | -17 | -1 |
| 22 | Chandrapur | 453 | 210 | 363 | 458 | 196 | 416 | 1 | -7 | 15 |
| 23 | Nasik R | 918 | 595 | 1131 | 924 | 534 | 1229 | 1 | -10 | 9 |
| 24 | Palghar | 310 | 183 | 147 | 312 | 193 | 218 | 1 | 5 | 48 |
| 25 | Pune R | 1162 | 607 | 933 | 1166 | 575 | 785 | 0 | -5 | -16 |
| 26 | Mumbai City | 1487 | 218 | 1540 | 1492 | 190 | 1579 | 0 | -13 | 3 |
| 27 | Washim | 201 | 126 | 126 | 200 | 111 | 182 | 0 | -12 | 44 |
| 28 | Sindhudurg | 115 | 51 | 198 | 112 | 49 | 125 | -3 | -4 | -37 |
| 29 | Jalgaon | 543 | 283 | 472 | 528 | 310 | 367 | -3 | 10 | -22 |
| 30 | Akola | 286 | 123 | 246 | 278 | 90 | 241 | -3 | -27 | -2 |
| 31 | Satara | 604 | 318 | 448 | 580 | 295 | 428 | -4 | -7 | -4 |
| 32 | Amravati R | 305 | 187 | 236 | 291 | 188 | 260 | -5 | 1 | 10 |
| 33 | Solapur R | 750 | 434 | 820 | 715 | 433 | 759 | -5 | 0 | -7 |
| 34 | Nanded | 559 | 307 | 340 | 523 | 296 | 274 | -6 | -4 | -19 |
| 35 | Bhandara | 242 | 114 | 229 | 225 | 97 | 240 | -7 | -15 | 5 |
| 36 | Solapur City | 148 | 52 | 138 | 137 | 50 | 103 | -7 | -4 | -25 |
| 37 | Kolhapur | 682 | 245 | 622 | 631 | 258 | 568 | -7 | 5 | -9 |
| 38 | Sangli | 621 | 332 | 476 | 569 | 296 | 456 | -8 | -11 | -4 |
| 39 | Buldhana | 426 | 244 | 403 | 386 | 219 | 289 | -9 | -10 | -28 |
| 40 | Nandurbar | 220 | 134 | 278 | 199 | 111 | 288 | -10 | -17 | 4 |
| 41 | Ahilyanagar | 1238 | 562 | 1007 | 1063 | 475 | 808 | -14 | -15 | -20 |
| 42 | Nagpur City | 736 | 185 | 717 | 624 | 139 | 646 | -15 | -25 | -10 |
| 43 | Dharashiv | 402 | 231 | 392 | 333 | 200 | 295 | -17 | -13 | -25 |
| 44 | Nagpur R | 599 | 279 | 623 | 496 | 216 | 583 | -17 | -23 | -6 |
| 45 | Yavatmal | 562 | 292 | 373 | 410 | 236 | 251 | -27 | -19 | -33 |
| | TOTAL | 21802 | 9731 | 19369 | 21497 | 9195 | 19277 | -1 | -6 | 0 |

# पोलीस ठाणे काटोल हद्दीतील डोंगरगाव पारधी बेडा व सरदार मोहल्ला अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर ०८ गुन्हे नोंद, ७६ हजार ९०० रूपयांचा मुद्देमाल जप्त काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक ०६/०८/२०२६ रोजी काटोल पोलीस स्टेशन हद्दीतील डोंगरगाव पारधी बेडा व सरदार मोहल्ला येथे महिला आरोपी या त्यांचे घराचे बाहेर खुल्या जागेत मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू गाळत आहे. अशा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी डोंगरगाव पारधी बेडा व सरदार मोहल्ला घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**आरोपी नामे १) भारतसिंग निहालसिंग बावरी, वय ४८ वर्ष, २) जसबीर जतनसिंग भोंड, वय ४० वर्ष, ३) विनोद शामराव पार्टेति व ०५ महिला आरोपी यांचेवर कारवाई करत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १७१८ लिटर मोहाफुल सडवा, ८० लिटर मोहाफुल गावठी दारू, प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ७६,९००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०८ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**





# मौदा पोलीसांच्या प्रभावी उपाययोजनांमुळे चोरीच्या गुन्हयांमध्ये लक्षणीय घट

दिनांक ०६/०८/२०२६ चे एका वृत्तपत्रात मौदा मे चोरी की बढती घटनांओ से रोष अशाशिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, **पोलीस स्टेशन मौदा हद्दीत चोरीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रीच्या वेळी दुहेरी (Dual) पेट्रोलिंग म्हणजे मौदा ग्रामीण आणि शहरी भागात पेट्रोलिंग तसेच मौदा शहरात २ चारचाकी वाहनाची सातत्याने पेट्रोलींग, संवेदनशील ठिकाणी विशेष गस्त, संशयित व्यक्तींची पडताळणी, वाहन तपासणी व अचानक नाकाबंदी अशा प्रभावी उपाययोजना सातत्याने राबविण्यात येत आहेत.**

**मौदा पोलीसांच्या प्रभावी उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून, जुलै २०२५ च्या तुलनेत जुलै २०२६ मध्ये चोरीच्या गुन्हयांमध्ये एकुण ५५ टक्के घट झाली आहे.तसेच सन २०२५ मध्ये दाखल गुन्ह्यांपैंकी ८९ टक्के उघड करण्यात आले आहे. तर सन २०२६ मध्ये आतापर्यंत दाखल झालेल्या ५९ टक्के गुन्हे उघड आहे. चोरीसह सर्व प्रकारच्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहतील.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २५ हजार १६० रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०६/०८/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा शिरपुर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) दयाराम पिटुजी मंडपे, वय ५४ वर्ष, २) गोवर्धन कोटीराम चहांदे, वय ४२ वर्ष, ३) रोशन सुरेश मेश्राम, वय ३३ वर्ष, ४) राजरतन भगवान तुपे, वय ३१ वर्ष, ५) कैलास सदाशिव तिडघाम, वय ३५ वर्ष, ६) नागो गोंविदा मडावी, वय ५० वर्ष, ७) पतीराम लक्ष्मन बोबडे, रा. वय ६१ वर्ष, रा. सर्व शिवपुर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ४५६०/—रूपये, ०४ मोबाईल असा एकुण २५,१६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# पोस्टे बुट्टीबोरी हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या ०५ आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद

पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :— **दिनांक ०६/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील स्टाफ अवैध धंदयावर कारवाई करत अवैध जुगार चालविणाऱ्या आरोपीविरूध्द ५ गुन्हे नोंद केले. सर्व कारवाईत एकुण ४,०४० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**कारवाई क्र. १)** रुईखैरी शिवारातील वाय पॉईटचे रोडलगत आरोपी नामे सचिन नामदेवराव टेकाम, वय ३७ वर्षे, रा.वार्ड नं ०२, परसोडी, ता. समुद्रपुर, जि. वर्धा, ह.मु. बुट्टीबोरी, जि, नागपुर हा अवैधरित्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**कारवाई क्र. २)** कुसुम कुंज कॉलनी प्लॉट मध्ये आरोपी नामे फिरोज शेटटी झाकणेकर, वय ४० वर्षे, रा. वार्ड नं ०२, सरकारी हॉस्पीटल जवळ बोरखेडी रेल्वे, ता. जि. नागपुर हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन अवैधरित्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**कारवाई क्र. ३)** आठवडी बाजार रोड सार्वजनिक ठिकाणी आरोपी नामे रशिद सौकतअली सैयद, वय ५० वर्ष, रा. शिक्षक कॉलनी नगरपरिषद रोड, बुट्टीबोरी, ता. जि. नागपूर हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन अवैधरित्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**कारवाई क्र. ४)** ईरा चौक बुट्टीबोरी सार्वजनिक ठिकाणी आरोपी नामे आशिष मधूकर हेलवटकर, वय ३८ वर्ष, रा. शिक्षक कॉलनी, मधूकर गिरडे यांचे घरी किरायाने बटुटीबोरी, ता. जि. नागपूर हा कागदावर वरली मटक्याचे आकडे अवैधरित्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र

जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**कारवाई क्र. ५)** मौजा रूईखैरी बिरसा मुंडा चौक समोर आरोपी अतुल मधुकर पोहीनकर, वय ३० वर्ष, रा. प्रभाग क्र. ०१, जुनीवस्ती बुट्टीबोरी, ता. जि. नागपुर हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन अवैधरित्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**